N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** जालना  **P.S.(ठाणे):** भोकरदन
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0245  **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**04/05/2023 02:46

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 03/05/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 03/05/2023
**Time From (वेळेपासून):** 16:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 04/05/2023  **Time (वेळ):** 02:20 बजे
(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 001
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/05/2023 02:36 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** भोकरदन येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): संजय कांताराव बुलगे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1970

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | माहोरा,जाफराबाद,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | माहोरा,जाफराबाद,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संजय महादेव पवार | | | 1. जेपीनगर, भोकरदन,भोकरदन , जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादि दि.03/05/2023

मी संजय कांताराव बुलगे,वय-53 वर्षे व्यवसाय -परमीट बार, रा. माहोरा ता.जाफ्राबाद जि. जालना मो.क्र. 9923911125
मी दिनांक 03/05/2023 रोजी भोकरदन येथे पोलीस निरीक्षक, हनुमंत वारे, यांचेकडे दोन पंचासमक्ष माझे हस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली होती की, मी वरील प्रमाणे असुन माझे माहोरा, बुलढाणा रोडवर ता. जाफ्राबाद येथे हॉटेल रेणुका, परमीट रुम असुन ते मी स्वत: चालवतो. माझे हॉटेल रेणुका परमीटरुम चे सन 01 एप्रील 2023 ते 31 मार्च 2024 चे लायसन्स नुतनीकरण करण्यासाठी मी दिनांक 23/03/2023 रोजी 67325/- रुपयाचे नियमाप्रमाणे ऑनलाईन चलन भरुन नुतनी करणाचा प्रस्ताव दिनांक 25/03/2023 रोजी दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भोकरदन ता.भोकरदन जि.जालना या कार्यालयात दुय्यम निरीक्षक, श्री. संजय पवार, यांच्याकडे सादर केला होता. तद्नंतर मी दिनांक 27/03/2023 रोजी माझे हॉटेल रेणुकाचे परमीट रुमचे लायसन्स नुतनीकरण संदर्भात दुय्यम निरीक्षक, श्री. संजय पवार यांना त्यांचे भोकरदन येथील कार्यालयात भेटलो असता श्री. पवार मला म्हणाले की, तुमचे लायसन्सचा प्रस्ताव माझे कार्यालयातुन त्रुटी न काढता मा. राज्य उत्पादन अधीक्षक, कार्यालय जालना येथे पाठवतो. अधिक्षक साहेबांशी बोलुन घेऊन तुमचे बारचे लायसन्स नुतनीकरण करुन टाकतो. त्यासाठी तुम्हाला मला व नवलकर साहेबांसाठी 30,000/- रुपये द्यावे लागतील असे म्हणाले होते. ते मागत असलेले पैसे हे लाच म्हणुन मागत असल्याचे माझे लक्षात आले होते. मी जर त्यांना लाचेचे 30,000/- रुपये दिले नाहीतर ते माझे बार चे लायसन्स नुतनीकरण करणार नाही. त्यामुळे माझे मोठे नुकसान होईल म्हणुन मी त्यांना नाईलाजास्तव दोन-तीन दिवसात पैसे जमवा-जमव करुन देतो. असे म्हणुन निघुन आलो होतो.
त्यानंतर दिनांक 30/03/2023 रोजी श्री. पवार साहेबांचा मला फोन आला की, बोलने झाल्याप्रमाणे पुर्तता का केली नाही. त्यावेळी मी त्यांना फोनवर बोललो होतो की, साहेब माझे बारचे लायसन्स नुतनीकरण साहेबांना बोलुन करुन टाका मी सध्या थोडा अडचणीत आहे. नंतर तुम्हाला येऊन भेटतो व पुर्तता करुन देतो. असे म्हणालो होतो. त्यानुसार काही दिवसांनी श्री.पवार साहेबांनी माझे लायसन्स माझे हॉटेल रेणुकावर आणुन दिले होते. त्यावेळी ते मला म्हाणाले की तुमचे हॉटेल रेणुका परमीट रुमचे लायसन्स नुतनीकरण प्रस्तावामध्ये त्रुटी न काढता सदर प्रस्ताव मी अधिक्षक कार्यालयास पाठवुन अधीक्षक साहेबांशी बोलुन नुतणीकरण करुन घेतले. त्याचा मोबदला म्हणुन सांगीतलेले 30 हजार रुपये दया असे म्हणाले असता, मी त्यांना सांगितले की मी सध्या अडचणीत आहे. नंतर येऊन भेटतो. असे म्हणाल्यावर ते निघुन गेले. त्यानंतर मागील महिन्यात पवार साहेबांनी मला वार-वार फोनकरुन 30,000/- रुपयाची पुर्तता करणेबाबत कळविले होते.
काल दिनांक 02/05/2023 रोजी सायंकाळी 7.20 वाजता श्री.पवार साहेबांनी मला माझे मोबाईल वर फोन करुन सांगितले की, तुम्ही तुमच्या बारचे नुतनीकरण करुन दिले. तरीही तुम्ही बो◌ेलणी झाल्याप्रमाणे पुर्तता केली नाही. तुम्ही उद्या भोकरदन येथे येऊन माझे ऑफिसला मला भेटा असे फोनवर सांगितले होते. मला श्री. पवार साहेबांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद येथे संपर्क करुन आज दिनांक 03/05/2023 रोजी माझी तक्रार घेण्यासाठी भोकरदन ला येऊन माझी तक्रार घेऊन सापळा कारवाई करण्यासंदर्भात कळविले होते.
त्यानुसार आज दिनांक 03/05/2023 रोजी भोकरदन परिसरात ला.प्र.वि.औरंगाबाद येथील पथकाची समक्ष भेट घेऊन वरील हकीगत सांगुन आज मी राज्य उत्पादन शुल्क, भोकरदन ता. भोकरदन जि.जालना या कार्यालयात दुय्यम निरीक्षक, श्री. संजय पवार, यांना भेटण्यासाठी जाणार आहे त्यावेळी श्री. पवार हे मला माझे हॉटेल रेणुका परमीट रुमचा सन 01 एप्रील 2023 ते 31 मार्च 2024 चे नुतनीकरण प्रस्तावामध्ये त्रुटी न काढता अधिक्षक साहेबांशी बोलुन नुतणी करण करुन दिले. या कामाचा मोबदला म्हणुन 30000/- रुपये लाचेची मागणी करुन



Scanned with OKEN Scanner

स्वत: अगर इतरांमार्फत स्विकारतील तेंव्हा त्यांना पैशासह पकडुन त्यांच्याविरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करावी ही विनंती आहे. वगैरे मजकुराची तक्रार लिहुन दिल्याने माझ्या तक्रारीचे अनुषंगाने पोलीस निरीक्षक, हनुमंत वारे यांनी पंच व आमच्या सर्वानुमते पैशाची मागणी होते किंवा कसे याची लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय दिनांक 03/05/2023 रोजी घेऊन आम्हा सर्वांना सापळा कारवाईच्या बाबत सुचना देऊन माहीती दिली. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देऊन पंच क्र.1 यांना सोबत घेऊन माझ्या कडील खाजगी वाहनाने, दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भोकरदन ता.भोकरदन जि.जालना या कार्यालयात दुय्यम निरीक्षक, श्री.संजय पवार यांच्या भेटी करीता रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच क्र.1 असे दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भोकरदन ता. भोकरदन जि.जालना या कार्यालयात दुय्यम निरीक्षक, श्री. संजय पवार यांची भेट घेतली. त्यावेळी भेटी दरम्यान पंच क्र. 1 यांचे समक्ष दुय्यम निरीक्षक, श्री. संजय पवार यांनी माझ्याकडे माझे हॉटेल रेणुका परमीट रुमचा सन 01 एप्रील 2023 ते 31 मार्च 2024 चे नुतनीकरण प्रस्तावामध्ये त्रुटी न काढता अधिक्षक साहेबांशी बोलुन नुतणीकरण करुन दिले आहे. या कामाचा मोबदला म्हणुन 30000/- रुपये लाचेची मागणी केली होती. लाचमागणी पडताळणी वेळी श्री. पवार यांनी माझ्याकडे तडजोडी अंती 15,000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी 15,000/- रुपये मुलाचे हाताने पाठवुन देतो तुम्ही किती वाजे पर्यंत ऑफिसला आहे. तेव्हा त्यांनी मला सायंकाळी सात-आठ वाजेपर्यंत आहे. असे म्हणुन श्री. संजय पवार यांनी 30,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 15,000/-रुपये लाच स्विकारण्याचे मान्य केले, त्यानंतर मी मुलाच्या हाताने किंवा स्वत: आणून देतो असे सांगून निघून आलो.

दुय्यम निरीक्षक, श्री.संजय पवार यांनी माझ्याकडे मागणी केलेली रक्कम 15,000/- रुपये ज्यामध्ये पाचशे रुपये दराच्या तीस चलनी नोटा पोलीस निरीक्षक, हनुमंत वारे यांचेकडे हजर केले व त्यांना सांगितले की, दुय्यम निरीक्षक, श्री.संजय पवार यांनी मला सदर लाचेची रक्कम घेऊन दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कार्यालय भोकरदन येथे बोलविले आहे. त्यानंतर पोलीस निरीक्षक, हनुमंत वारे यांनी त्यानोटांचे नंबर घेऊन त्यानोटांना त्यांच्या पथकातील पोलीसाकडुन पंचासमक्ष पावडर (ऍन्थ्रॉसीन पावडर) लावुन माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या खिशात ठेवुन दिल्या. त्यानंतर पंच क्र.1 यांच्यासह माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करुन दिला. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे माझ्या खाजगी वाहनाने दुय्यम निरीक्षक, श्री.संजय पवार यांचे भेटी करता दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भोकरदन येथे गेलो. त्या ठिकाणी पोहोचल्यावर श्री.संजय पवार यांची भेट घेऊन माझे कामाबाबत बोललो आमच्या चर्चेदरम्यान तुम्ही सांगितल्या प्रमाणे पंधरा आणलेले हे, पंधरा हजार देऊन देऊ पटकन कोणी येऊन जात इकडं असे म्हणालो असता श्री. पवार यांनी त्यांचे डाव्या हाताने त्यांचे समोरील टेबलचा ड्रावर उघडुन उजव्या हाताचे बोटाने ड्रावर मध्ये पैसे टाकण्याचा इशारा पंचासमक्ष केला. त्यावेळी मी त्यांना ड्रावरमध्ये टाकु का असे म्हणालो असता श्री. पवार यांनी हं.. असे म्हणुन होकार दिला. त्यावेळी मी सदर पैसे त्यांनी इशारा केलेल्या ड्रावरमध्ये टाकले त्यानंतर मी त्यांना म्हणालो की, मोजुन घ्या असे म्हणालो असता त्यांनी माझे हॉटेलचे नामांतर करण्याचा विषय काढुन बिअर शॉप पण चालु करायच असेल ना असे म्हणाले. पैसे ड्रावरमध्ये टाकल्यानंतर मी पुर्वनियोजीत ठरलेला इशारा केला ती वेळ 16.30 वाजेची होती. माझ्या इशाऱ्या नंतर लगेचच सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी हजर आले. त्यांनी दुय्यम निरीक्षक, श्री.संजय पवार यांना ताब्यात घेतले त्यांना सापळा पथकाचा परिचय देवून त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव संजय महादेव पवार वय-46 वर्षे व्यवसाय नोकरी पद-दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भोकरदन जि.जालना रा. जे.पी.नगर, भोकरदन ता.भोकरदन जि.जालना मुळ पत्ता- सी-1/401,पनवेलकर कॅम्पस बेथेल चर्च रोड, अंबरनाथ वेस्ट जि. ठाणे असे सांगितले. त्यानंतर स्विकारलेल्या लाच रकमेबाबत पोलीस निरीक्षक, हनुमंत वारे यांनी मला व पंच क्र. 1 यांना विचारले असता श्री. संजय पवार यांनी लाचेची रक्कम त्यांचे समोरील टेबलच्या डाव्या बाजुच्या ड्रावर ओढुन ड्रावरमध्ये ठेवण्याचा उजव्या हाताने इशारा केल्याने सदर लाचेची रक्कम 15,000/- रुपये ड्रावरमध्ये ठेवले असल्याचे कळविले. त्यावरुन सदर लाचेची रक्कम श्री. संजय पवार यांचे समोरील टेबलचे डाव्या बाजुचे ड्रावरमधुन 500/- रुपये दराच्या तीस चलनी नोटा असे एकुण 15,000/- रुपये पोलीस निरीक्षक, हनुमंत वारे यांनी सांगितल्यावरुन पंच क्रं. 2 यांनी काढुन त्यांच्याकडे ठेवल्या.

तरी दिनांक 03/05/2023 रोजी दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कार्यालय, भोकरदन जि.जालना 16.30 वाजता संजय महादेव पवार वय-46 वर्षे व्यवसाय नोकरी पद-दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भोकरदन जि. जालना रा. जे.पी.नगर, भोकरदन ता.भोकरदन जि.जालना मुळ पत्ता- सी-1/401,पनवेलकर कॅम्पस बेथेल चर्च रोड, अंबरनाथ वेस्ट जि. ठाणे यांनी माझे हॉटेल रेणुका परमीट रुमचा सन 01 एप्रील 2023 ते 31 मार्च 2024 चे नुतनीकरण प्रस्तावामध्ये त्रुटी न काढता अधिक्षक साहेबांशी बोलुन नुतणीकरण करुन दिले. या कामाचा मोबदला



Scanned with OKEN Scanner

म्हणुन प्रथम 30000/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 15,000/- रुपये पंच क्र.1 यांचे समक्ष स्विकारले आहे. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे. तरी दुय्यम निरीक्षक, श्री. संजय पवार यांचेवर योग्य ती कारवाई होणेस विनंती आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टाईप केली असुन ती मी वाचुन पाहिली बरोबर व खरी आहे.

हि फिर्याद दिली सही.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Yuvraj Rajaram Padale

**No.**(क्र.):

**Rank** (पद): SI (Sub-Inspector)

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो.ठाणे अमलदार
पोलीस ठाणे भोकरदन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)